महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश/२०२२/ 3141 दिनांक : ०५.०७.२०२२

**परिपत्रकः** 05 JUL 2022

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एच.एम.सी.टी./एस.सी.टी. अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे

**विषय : दि. ०६.०७.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदविका प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने दृकश्राव्य पध्दतीने आयोजित करण्यात येणा-या बैठकीबाबत..**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक जावक क्रमांक १०/एडीएम/प्रवेश आढावा बैठक/२०२२/५५७ दिनांक ०५.०७.२०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, संदर्भीय परिपत्रकामध्ये प्राप्त निर्देशानुसार आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील इयत्ता १०वी नंतरचे प्रथम वर्ष पदविका, इयत्ता १२वी नंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने प्रवेश प्रक्रियेच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी **दिनांक ०६.०७.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता दृकश्राव्य (Video Conferencing)** पध्दतीने बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर बैठकीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सर्व विभागीय कार्यालयातील सहसंचालक व सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई येथील संचालक व सचिव, म.रा.तं.शि. मंडळाच्या सर्व विभागीय कार्यालयांमधील उपसचिव, तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांचे प्राचार्यांना उपस्थित राहण्याकरीता संचालनालयाकडून संदर्भीय परिपत्रकान्वये सूचित केलेले आहे. आपण स्वतः सदर बैठकीस उपस्थित रहावे. संचालनायाकडून बैठकीसाठीची लिंक प्राप्त होताच या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर **(https://www.ropune.org.in/ropune/circular.php)** प्रसिध्द केली जाईल. सदर बैठकीसाठी सर्वांनी आजपर्यंत झालेल्या पदविका प्रवेशाच्या नोंदणीचा अहवाल तयार ठेवावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (**कार्यासन क्रमांक १०**)